महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२०-२१/२०२१/ १२६२ दिनांक : ०६.०३.२०२१

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांच्या कार्यवाहीबाबत..

संदर्भ : १) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७ दि ०३.१२.२०२०.
२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२०/४८ दि ०५.०१.२०२१.
३) तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/१३ दि १३.०१.२१.
४) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२०/२३३ दि. १४.०१.२०२१.
५) तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/४६ दि ११.०२.२१.
६) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२१/७६१ दि. ११.०२.२०२१.
७) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२१/११९८ दि. ०३.०३.२०२१.
८) तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/७८ दि ०४.०३.२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता, महाडीबीटी पोर्टल दिनांक ०३.१२.२०२० पासून शासनाकडून सुरु करण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक २, ४, ६ व ७ मधील परिपत्रकान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना, महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी लवकरात लवकर विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेऊन संस्थांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज प्रलंबित न ठेवता योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी करुन पुढे पाठवण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

डीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना आधार बेस्ड व नॉन आधार बेस्ड असे दोन पर्याय उपलब्ध असून मागील वर्षी काही विद्यार्थ्यांनी योजनेसाठी आधार बेस्ड व नॉन आधार बेस्ड अशा दोन्ही पर्यायांतर्गत अर्ज भरल्याचे व संस्थांकडून मंजूर करण्यात आल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देतेवेळी तांत्रिक बाबी निर्माण झाल्या आहेत.

तरी ही वस्तूस्थिती लक्षात घेता, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त येणा-या सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकडून योजनांचे नॉन आधार बेस्ड अर्ज न भरता आधार बेस्ड अर्ज भरुन घ्यावेत. तसेच सदर आधार बेस्ड अर्ज विद्यार्थ्यांकडून ऑनलाईनरित्या अंतिम (Submit) करतेवेळी विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक बॅक खात्याशी संलंग्नित असणे पूर्वापेक्षित (Prerequisite) आहे.

**तसेच विद्यार्थ्याने आधार बेस्ड व नॉन आधार बेस्ड असे दोन्ही प्रकारचे अर्ज ऑनलाईनरित्या भरुन अंतिम केले असल्यास, संस्थेने संस्थास्तरावरुन नॉन आधार बेस्ड अर्ज रद्द करावा. संस्था स्तरावरुन विद्यार्थ्याने भरलेले दोन्ही प्रकारचे अर्ज ऑनलाईनरित्या पुढील कार्यवाहीसाठी पाठविल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्यांची राहिल याची नोंद घ्यावी.**

(एम. आर. जाधव)
सहायक संचालक (तांत्रिक),
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेसाठी.